श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी,ता.जामखेड यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्राप-३/२४८/२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ - १. या कार्यालयाचे आदेश ई ऑफीस क्रमांक.१०६०९५२ /२०२५ दिनांक २६/०३/२०२५ (सेवा निलंबन आदेश)

२. या कार्यालयाचे ज्ञापन ई ऑफीस क्रमांक १३५३६६६ दिनांक २१/०६/२०२५

३. गटविकास अधिकारी जामखेड यांचे पत्र आस्था-२/५१/ दिनांक २५/०६/२०२५ चे पत्र (श्री.वळेकर यांना ज्ञापन पोहोच दिनांक २४/०६/२०२५)

४.श्री वळेकर राजेंद्र बन्सीधर,ग्रामपंचायत अधिकारी यांचा खुलासा दिनांक ०३/०७/२०२५

५. सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.वशिअ-१३२५/प्र.क्र.४५/विचौ-१,मुंबई दिनांक २५ एप्रिल, २०२५.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम (६) (३)

ज्याअर्थी, श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी,ता. जामखेड येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.२ अन्वये एकुण ०६ दोषारोप ठेवण्यात आले होते. संदर्भ क्र.२ नुसार श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी, ता.जामखेड यांनी खुलासा सादर केला असुन श्री वळेकर यांनी संदर्भ क्र.४ नुसार दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत.

सबब, श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी,ता. जामखेड यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत, नान्नज व जायभायवाडी,ता.जामखेड यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने श्री शंकर रामभाऊ गायकवाड, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती जामखेड यांची नियुक्ती करीत आहे .

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीच्या तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२९०६०९९९ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-07-2026 16:42:58
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री राजेंद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत, नान्नज व जायभायवाडी, ता. जामखेड यांची गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री गायकवाड शंकर रामभाऊ, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती जामखेड.
व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

२/- सादरकर्ता अधिकारी म्हणुन आपली नियुक्ती करण्यात आलेली असुन संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकाचे सुक्ष्म अवलोकन करुन पुढील नियमोचित कार्यवाही करावी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

२/- सोबतचा आदेश श्री राजेद्र बन्सी वळेकर, ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर